# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०१/०७/२०२४

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नाव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो स्टे. खोलापुरी गेट १५५/२०२४ कलम ३२४,५०४ भादवि | अमरावती | २९/०६/२०२४ चे २३/३० वा ३०/०६/२०२४ चे १७/१९ वा | एक महिला | मनोज चंदु शर्मा वय २८ वर्ष रा आनंद नगर रामेश्वर मंजीरा जवळ अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ची आरोपी सोबत ओळखी झाल्याने ते नेहमी भेटायचे व दिनांक २९/०६/२०२४ रोजी ११/०० वा फिर्यादी आरोपी सोबत त्याचे घरी गेली असता तिला लहान मुलगी घरी दिसल्याने तिने आरोपीला विचारले हि कोण आहे तर त्याने माझी मुलगी व पत्नी आहे असे सांगीतल्याने वरुन फि ने विचारले की लग्न झाले आहे असे मला का नाही सांगीतले वरुन यातील आरोपी याने फि हीस लाथाबुक्यांनी व प्लास्टिक चे पाईप ने दोन्ही पायाचे मांडीवर हातावर व डावे डोळ्यावर मारुन जखमी केले अश्या फिचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टीवरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नाव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | राजापेठ अप क्र ३८४/२०२४ कलम ३५४,४५२, ३२३,५०४, ५०६ भादवी | अमरावती | घ.ता .वेळ दि. ३०/०६/२०२४ चे ०२.०० वा दा.ता.वेळ. दि.३०/०६/२०२४ चे. २०.३४ | एक महिला | पिडीत महिलेचा भाऊ | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की , फीर्यादी त्यांचे पती व मुलगा हे एकत्र राहतात फी चे आंतरजातीय लग्न झाले आहे. फी चा मोठा भाउ आरोपी हा दारु पिण्याचे सवईचा आहे त्याचे दोन लग्न झाले असुन तो काही काम धंदा करीत नाही त्या कारणाने त्याच्या दोन्ही बायका त्यास सोडुन गेल्या आहे तो आई वडीलांना त्रास देतो त्या कारणाने त्याला आई वडीलांनी घरा बाहेर काढले आहे आरोपीने फी चे आई वडीलांना मारहान केल्यामुळे पोस्टे खोलापुरी गेट येथे गुन्हा दाखल आहे आरोपी हा नेहमी अर्जदाराचे घरी येतो व दारु पिवुन तमाशा करतो व अर्जदाराचे पतीस शिवीगाळ करुन मारण्याची धमकी देतो नमुद घ ता वेळी व ठीकाणी आरोपी हा फी चे घरी जबरदस्ती आला व फी तुला व तेझे नव-याला मारतो असे म्हणुन व शिवीगाळ करुन तुझे पुर्ण खानदानाला मारतो असे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | म्हणुन त्यास कारण विचारले असता त्याने फी चे अंगावर येवुन छातीला हात मारला व पती अडवीण्यास आले असता फी व फी चे पतीस मारहान करुन स्वताचे जिवाचे बरेवाईट करतो व तुम्हाला फसवीतो अशी धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्याचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नाव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ५८८/२०२४ कलम ३७६ (२)(N), ५०६ भादवी | अमरावती | घ ता वेळ दि. २३/११/२०२० चे १५/०० वा ते दि. २५/०५/२०२४ चे १४/३० वा पावेतो रि ता वेळ दि. ३०/०६/२०२४ चे १३/२० वा | एक महिला | अनिरूध्द सिंग खानजी वाघेला वय ४० वर्ष रा. कंबाई ता. चानसमा जि. पठाण गुजरात | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल फिर्यादी हि दुकानात काम करीत असतांना तेथे आरोपी सोबत फिची ओळख झाली व नंतर त्यांचे फोन वर बोलने सुरू झाले यातिल आरोपीने फि ला लग्नाची मागनी सुध्दा केली नमुद घ ता वेळी व ठिकानी फि चा वाढदिवस असल्याने यातिल आरोपीने फि च्या घरी जावुन केक कट केला व फि सोबत जबरजस्ती शारीरीक संबध प्रस्थापीत केले व त्यानंतर हि आरोपी ने फि ला लग्नाचे आमिष दाखवुन वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापीत केले दि. २५.०५.२०२४ रोजी फि ने आरोपीस कॉल केला असता उचलला नाहि आरोपीचे पत्नीने कॉल उचचला व फि ने तिला सर्व हकिकत सांगितली त्यानंतर आरोपी ने फि ला फोन करुन मै तेरे को पहचानता नही और मै तेरे से शादी नही करता तु ईधर आयेगी तु वापस नही जायेंगी अशी धमकी दिली. यातिल आरोपीने फि ईच्छेविरुध्द जबरजस्ती शारीरीक संबध प्रस्थापीत केले व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फि चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➤ घरफोडी:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. राजापेठ अप क्र ३८५/२०२४ कलम ४५४, ३८० भादवी | नंदनवन कॉलनी मनोर मांगल्य जवळ अमरावती | घ.ता .वेळ दि. ३०/०६/२०२४ चे १४.३० ते १५.३० वा<br>दा.ता.वेळ. दि.३०/०६/२०२४ चे. २२.११ वा. | प्रदीप गौतम वय ३७ रा नंदनवन कॉलनी मनोर मांगल्य जवळ अमरावती | अज्ञात | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फीर्यादी हॉस्पीटल येथे गेले व काम आटोपुन घरी परत आले असता घराचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले घरात आत जावुन पाहीले असता रुम मधील अलमारी तोडली असल्याचे दिसुन आले व त्यातील सर्व सामान अस्ताव्यस्त होते अलमारीची पाहणी केली असता अलमारीतील रोख २०,००० रु सोन्याचे मंगळसुत्र २ ग्रॅम कि १०,०००रु , सोण्याची चेन ४ ग्रॅम कि २३००० रु सोण्याची नाकाची बाली व लॉंग ०.७५ ग्रॅम कि ३५०० रु चांदीची पायल कि २७५०, चांदी सीक्का कि ६०० रु चांदी कडा कि २००० रु चांदी पायल कि ३५०० रु असा एकुण ६५,३५० रु चा माल दिसुन आला नाही कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे कुलुप तोडुन चोरी केली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

वाहण चोरी -

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र ५९०/२०२४ कलम ३७९ भादवी | प्रोफेसर कॉलनी, श्रुती अपार्टमेंट मंगलधाम अमरावती | २९/०६/२०२४ चे ११/००ते ३०/०६/२०२४ चे ०८/०० वा. दरम्यान<br>गु.दाखल ता. वेळ दि. ३०/०६/०२०२४ चे २१/१० वा. | सुमेध भिमानंद साळुंखे वय ३३ वर्षे व्यवसाय बांधकाम ठेकेदार रा.प्रोफेसर कॉलणी मंगलधाम अमरावती | रॉयल इनफील्ड कंपनीची बुलेट मोटार सायकल जुनी वापरती कि.अं. ५०,०००/- रुपये | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फियादी हे कामावरुन घरी परत आले व त्याची बुलेट गाडी ही क्र. एम एच २७ सीयु ५१६७ ,इंजीन नं. चेचीस नं. अशा क्रमांकाची किंमती ५०,०००/- रु. ची फियादी यांनी लॉक करुन ठेवली होती दि. ३०/०६/२०२४ चे सकाळी ०८/०० वा. दरम्यान फियादी हे कामावर जाण्यासाठी निघाले असता त्याना गाडी ठेवलेल्या टीकाणी दिसुन आली नाही कोणी तरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र. ५९१/२०२४ कलम २७९,३३७ भादवी | लोकशाही भवन चे पुढे विद्यापीठ रोड अमरावती | ३०/०६/२०२४ चे २०/१० वा. दा. ता. वेळ ३०/०६/०२०२४ चे २२/२७ वा. | मंगेश वासुदेवराव पारीसे वय ३३ वर्षे व्यवसाय तलाठी सि/ओ घौर उत्कर्ष हाऊसींग सोसायटी विद्यापीठ रोड अमरावती | प्रमोद वसंतराव ठाकरे रा. हुसेनपुर बोर्डी ता. तिवसा जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी की यातील फिर्यादी हे त्याचे पत्नी याचेसह त्याचे मोपेड क्र.एम एच २७ एपी३०७१ हिचेवर बसुन अमरावती ते कुर्हा रोडने जात असतांना लोकशाही भवन चे पुढे फिर्यादी चे मोटर सायकल ला विद्यापीठ कडुन येनारी अल्टो कार क्र.एमएच २७ डीएल ३३४६चे चालकाने हयगई ने निष्काळजीपनाने चालवुन मोटार सायकल ला धडक दिल्याने फिर्यादीचे उजव्या हाताला मार लागुन गंभीर दुखापत झाली व पत्नीला पण मार लागला.अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन अप सदरचा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नाव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा मर्ग क्र ३८/२०२४ कलम १७४ जाफौ | शिवाजी चौक देशीदारु दुकानाबाजुला नवी वस्ती बडनेरा | अनोळखी इसम वय अंदाजे ६० वर्षे | सरतर्फे पोउपनि संजय देशमुख पो ठाणे बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि ३०/०६/२०२४ रोजी १४.०० ते २१.०० ड्युटी असताना वायरलेसद्वारे माहीती मीळाली की एक इसम शिवाजी चौक बुधलानी चौक नवी वस्ती बडनेरा येथे पडलेला आहे अशा माहीतीवर घटनास्थळी जावुन अनोळखी इसमास इर्विन दवाखाना येथे नापोक १२६१पोका १७८८ हस्ते रवाना केले असता सदर अनोळखी इसमास डॉ सा यांनी तपासुन मृत घोषीत केले सदर अनोळखी इसम वय अंदाजे ६० वर्षे डी ओ सा यांनी आदेश केल्याने सदर अनोळखी इसमास ओळख पटविने करीता मच्चुरी येथे ठेवण्याची विनंती केली आहे व पोस्टे ला परत येवुन सदर मर्ग दाखल |
| २ | पो . स्टे. राजापेठ मर्ग क्र ५३/२४ कलम १७४ जाफौ | जंगममठ चुनाभट्टी अमरावती दि ३०/६/२४ चे २०.१० वा पुर्वी दाखल दि ३०/६/२४ चे २३.४० वा | एक महिला | अक्षय विठइलराव इंदापुरकर वय ३० रा चुनाभटी अमरावती | थोडाक्यात हकीगत अशा प्रकारे आहेकी फीयादीची मृतक ही मामे बहीन असुन ती तिची मावशी चे घरी लहानपनापासुन राहते व तिचे आई वडील वेगळे राहटगाव येथे राहते नमुद घ ता वेळी वठीकाणी फीर्यादी घरी असतांना त्यांची मावशीचा ओरडण्याचा आवाज आला असता फी व त्यांचा मामेभाऊ व आजुबाजुच्या लोक यांनी बाहेर येवुन बघीतले असता फी चे मावशीचे दार आतूनबंद होते व खिडकीतुन आत पाहीले असता मयत हीने समोरच्या रुम मध्ये पंख्याला गळफास घेतलेला दिसुन आला वरुन दाराला धक्का देवुन दार उघडुन आत गेलो असता तिने ओढनीने पंख्याला लटकुन गळफास घेतला होता. ती कुठलीही हालचाल करीत नव्हती वरुन पोलीसांना फोन केला असता पोलीस आले व त्यांनी मयत हीला खाली उतरवीले पुढील कार्यवाही करीता ईर्वीन हॉस्पीटल येथे नेले असता डॉ यांनी तिला तपासुन मयत घोषीत केले मयत हीचे शेजारील मुलगा याचेशी प्रेम संबंध होते तो आजाराने दि २९/६/२४ रोजी अचानक मरण पावला त्या मुळे गायत्री हीने घरी कोणीही नसतांना ओढनीने गळफास घेवुन आत्महत्या केली असावी तिचे मरणा बाबत काही शंका नाही असे फी चे जवाणी रिर्पोट वरुन तसेच ईर्वीन मेमो क्र १७२२ प्राप्त झल्या वरुन डी ओ आदेशाने सदरचा मर्ग दाखल |